ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# सक्षमता आधारित शिक्षक शिक्षण

**अर्चना ज्ञानोबा अडसुळे**
*डॉ.डी.वायपाटील शिक्षणशास्त्र महविदयलय*

Scholarly Research Journal's ***is licensed Based on a work at*** www.srjis.com

**प्रस्तावना—** इ. स. १९६०—७० च्या दशकाच्या उत्तरार्धामध्ये अमेरिकेमध्ये या संकल्पनेचा उदय झाला.वास्तविक हा शिक्षक प्रशिक्षणाचा कार्यक्रम परंतु CBTE ही चळवळ एक वैचारिक चळवळ बनली व तिचा परिणाम शिक्षणाची उद्‌दिष्टे ठरविण्यापासून ते सांस्कृतिक जीवनापर्यंत झाला.तत्पुर्वी सहाव्या दशकामध्ये ही चळवळ Performance Based Teacher Educationम्हणून ओळखली जात होती. अमेरिकमेधील ४०० प्रशिक्षण संस्थामधून या प्रकारचा PBTEकार्यक्रम राबविला जात असे, परंतु हळूहळू ही संज्ञा शिक्षक प्रशिक्षणातून लोप पावली व त्या ठिकाणी ही संज्ञा आली या दोन्हीमध्ये निश्चित असा फरक आहे.PBTEमध्ये शिक्षक प्रशिक्षण घेतल्यानंतरच्या शिक्षकाच्या कार्यमानाचा विचार केला जात असे.CBTEमध्ये घेऊन शिक्षकांमध्ये किमान अपेक्षित क्षमातांच्या विकासाचा विचार केला जाऊ लागला.

**❖ सक्षमता आधारित शिक्षक शिक्षण संकल्पना —**

‘Competence ’या इंग्रजी शब्दाचा अर्थ,‘‘adequate for the purpose, suitable, sufficient, admissiblem capable असा दिलेला आहे. येथे या पैकी पहिला अर्थ विचारात घेतला तर ही संकल्पना समजून घेणे सोपे होते.

शिक्षक म्हणून काम करण्यासाठी कोणत्या बाबी पुरेशा आहेत याचा विचार CBTEमध्ये केला जातो. किंवा किमान आवश्यकता Minimum requirementsम्हणजेच सक्षमता म्हटले तर गैर ठरणार नाही.CBTEहा कार्यक्रम किमान गुणवत्तेवर भर देतो.

या कार्यक्रमाचे पुरस्कर्ते असे मानतात की, ज्या विद्यार्थ्याला अध्ययन करण्यापुर्वी उद्‌दिष्टांची जाणीव असते. असा विद्यार्थी ज्या विद्यार्थ्याला उद्‌दिष्टाची जाणीव नसते त्यापेक्षा जास्त चांगल्या रितीने व जास्त अध्ययन करतो.

CBTEही उद्‌दिष्टे ठरविताना दोन गोष्टींचा विचार करते

१) शिक्षकला कोणत्या स्वरुपाचे काम करावे लागणार असते व त्यासाठी त्याच्या गरजा काय असतात. २)शिक्षक प्रशिक्षण पूर्ण केल्यावर त्याच्या ज्ञानात बदल होण्यापेक्षा कार्यमानात अपेक्षित सुधारणा होणे आवश्यक आहे.

इतर अभ्यास शाखांप्रमाणे केवळ विशिष्ट घटकांचा अभ्यास न करता शिक्षकाने कोणत्या बाबींचे अध्ययन करावे म्हणजे त्याच्या अध्यापनामध्ये किंवा कार्यमानामध्ये अपेक्षित सुधारणा होईल या दृष्टीने विचार करणे येथे अभिप्रेत आहे.

हे प्रशिक्षण पुर्ण केल्यावर शिक्षकामध्ये कोणते वर्तन बदल कोणत्या पातळीपर्यंत अपेक्षित आहेत हे सक्षमतेच्या संदर्भात ठरविले जाते.

**❖ शिक्षकांसाठी क्षमतेचीआवश्यकता–**

शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमता निश्चित करणे व त्या विकसित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे असा प्रवाह नव्यानेच शिक्षणक्षेत्रात येत आहे.

शिक्षक हा शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या प्रक्रियेतील सर्वात प्रभावी घटक मानला जातो. त्यादृष्टीने शिक्षकांची क्षमता वाढविणे गरजेचे ठरते.

विषय ज्ञान अध्यापन कौशल्य आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्यासाठी आवश्यक अभिप्रेरण यांना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे.

एक व्यावसायिक (Professional)या दृष्टीने त्यांच्या दृष्टीने त्यांच्या बौध्दिक आणि भावनात्मक विकास घडवून आणणे हीच शालेय गुणवत्ता वाढविण्याची गुरुकिल्ली आहे.

प्रत्येक व्यक्ती स्वत:हुन खुप ज्ञान प्राप्त करु शकते आणि त्यावर विचार व चिंतन करुन, कल्पकतेची जोड देऊन आपले अंगीकृत कार्य अधिक चांगल्या प्रकारे करता यावे दृष्टीकोनातून शिक्षकांमधील क्षमताचा विचार महत्वाचा ठरतो.

**❖ क्षमता(Competencies) –**

अर्थ– प्रत्येक माणसामध्ये उपजत गुण व सुप्त शक्ती यांचा भरणा असतो. त्यांचे रुपांतर दृश्य उपयोगितेत होते तेंव्हा त्या प्रक्रियेस 'क्षमता' असे म्हणतात.

क्षमता म्हणजे आंतरिक शक्ती –शिक्षणक्रमाच्या संदर्भात या शक्ती बौध्दिक स्वरुपाच्या आहेत. त्या शिक्षणाद्वारे विकसित करता येतात. जितक्या प्रमाणात या शक्ती क्षमता विकसित होतील तितकी त्या व्यक्तीची यशस्वी व्यावसायिक होण्याची शक्यता अधिक असते.

कोणतेही काम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी त्या व्यक्तीच्या ठिकाणी जन्मजात(Innate)आणि संपादित (Acquired)क्षमता असाव्या लागतात.

शिक्षक म्हणजे एक व्यावसायिक त्याच्या ठिकाणी काही निश्चित क्षमतांची अपेक्षा असते.शिक्षकाने व्यावसायिक कामांसाठी स्वत:ला सज्ज करावे.व्यावसायिक कामे योग्य अंतदृष्टी बाळगून कार्यक्षमतेने तडीस नेण्यासाठी सक्षम बनावे म्हणून क्षमताक्षेत्रे निश्चित केली आहेत.

केवळ पुस्तकी ज्ञानाची आणि संबोधाची समज यावी म्हणून नव्हे तर आत्मविश्वासाने व व्यावसायिक दृष्टीने आपल्या जबाबदाऱ्या नेटाने पार पाडण्यास शिक्षकांनी समर्थ व्हावे म्हणून या क्षमताक्षेत्रांची आखणी केली आहे.

मूलत: त्या शिक्षक क्षमता असल्याने शालेय दर्जा वाढावा व विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विकास व्हावा हे त्यांचे उद्दिष्ट आहे.

प्रभावी शिक्षक होण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले सर्व पेलू दहा प्रमुख क्षमतांच्या स्वरुपात संवर्गात केलेले आहे.शिक्षक क्षमतांमध्ये स्पष्ट संबोध, आशेय संदभ्र, व्यवहार, मुल्यमापन इत्यादी पैलूंचा समावेश केलेला आहे. अशा रीतीने निश्चित केलेली सर्व क्षमता क्षेत्रे एकापेक्षा अधिक कृतिक्षेत्रांवर केंद्रीत केली असून पुस्तकीज्ञान व व्यवहारज्ञान यावर ती प्रकाश टाकतात.

**❖ राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने (NCTE)नमुद केलेल्या दहा क्षमता पुढीलप्रमाणे आहेत.**

१) **संदर्भ क्षमता(Contexual Competencies)**

२) **संबोध क्षमता(Conceptual Competencies)**

३) **आशयज्ञान क्षमता(Content Knowledge Competencies)**

४) **शैक्षणिक व्यवहार क्षमता /अध्यापनक्षमता (Transactional Competencies)**

५) **शैक्षणिक उपक्रम क्षमता(Competencies Related to other Education Activities)**

**६) शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर क्षमता.(Competencies Related to Teaching and Learning Material)**
**७) मुल्यमापन क्षमता(Evaluation Competencies)**
**८) व्यवस्थापन क्षमता(Management Competencies)**
**९) पालक सहकार्य क्षमता(Competencies Related to Parental Co - operation)**
**१०) समाज सहकार्य क्षमता (Competencies Related to Co - operation with Community)**

**१) संदर्भ क्षमता(Contexual Competencies)**

'आपल्या कार्याशी संबंधीत कर्तव्ये उद्‌दिष्टांनुरुप पार पाडतांना त्या कार्याचा इतिहास, पार्श्वभुमी, सद्यस्थिती व उद्‌दिष्टे यांचे विविध संदर्भ व संबोध जाणण्याची व त्याद्‌वारे स्वत: प्रेरित होऊन इतरांना प्रेरित करण्याची क्षमता म्हणजेच संदर्भक्षमता होय.'

शिक्षकाचा व्यवसाय हा केवळ शिक्षण प्रक्रियेचाच अविभाज्य भाग आहे असे नाही. तर संपुर्ण समाज व्यवस्थेचा, सांस्कृतिकतेचा तो भाग आहे. म्हणूनच राष्ट्रीय व राज्य पातळीवरील शिक्षण व्यवस्थेचे ज्ञान शिक्षकाला असणे आवश्यक आहे. सर्वकष, व्यापक पातळीवर व स्थानिक दृष्टया व व्यवस्थेचे नाते कोणते याचेही ज्ञान शिक्षकांना आवश्यक आहे.

कमी पटनोंदणी, गळती, स्थगिती यांसारख्या प्रश्नांचीही जाणीव असावी.
विकास — कार्यक्रम, नागरीकरण, बेकारी, मुल्यसंस्कार राजकीय परिस्थिती आणि शास्त्रीय व तांत्रिक प्रगतीचा जीवनावर होणाऱ्या परिणामांबाबत जाणीव असावी.
एखादा विशिष्ट समाज मागे का पडला याची कारणे शिक्षकाने जाणून घ्यावीत.
शिक्षकांच्या कृतीबद्‌दल समाजात विश्वासार्हता निर्माण झाली पाहिजे.
विद्यमान संदर्भाबाबत ते जागरुक असले पाहिजेत आणि त्या संदर्भातच त्यांच्या क्षमतांचा व कौशल्यांचा विकास झाला पाहिजे.
विद्यमान अभ्यासक्रमाद्‌वारे अशा क्षमतांचा विकास झाला पाहिजे.

**२) संबोध क्षमता**(Conceptual Competencies)

'शिक्षणातील सिध्दांत आणि विविध विचारप्रवाह पध्दरती, तंत्रे व संज्ञा यांच्याबद्‌दल पुर्ण वैचारिक स्पष्टता असणे म्हणजेच संबोध क्षमता होय.'

व्यावसायिक शिक्षणक्रम हा काही पायाभूत ज्ञानशाखांवर आधारित असतो. या प्रत्येक शाखेत विशिष्ट, संज्ञा, संबोध, तत्वे यांची चर्चा केलेली असते. त्यांचे सुलभरित्या आकलन झाले तर विद्यार्थी अध्ययन अध्यापन प्रक्रिया इत्यादी समजावून घेण्यास मदत होते.

शिक्षणाच्या विक्रासाबरोब नवीन संधोध संज्ञा, शब्दप्रयोग प्रचलित होत आहेत. संबोधा बाबत वैचारिक स्पष्टता येण्यासाठी त्या संबोधाचा अर्थ काय आणि तो संबोध कसा स्पष्ट करता येईल यावर चिंतन करावे. वाचन चर्चा होण्यास आणि त्यासंदर्भातील चिंतन यामुळे संबोध अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

शिक्षण प्रक्रियेशी काही महत्वाच्या संबोधांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. उदा. अभ्यासक्रम, पाठयक्रम, अध्ययन, निष्पत्ती, अध्यापन, गुणवत्ता, प्रभुत्व पाती, क्रमान्वित अध्ययन. काही संबोधांचे अर्थ आपल्याला समजतात परंतु तो अर्थ स्पष्ट व नेमकया शब्दात मांडता येत नाही. त्यात संदिग्धता राहते. म्हणून संबोधक्षमता महत्वाची ठरते.

**३) आशयज्ञान क्षमता**(Content KnowledgeCompetencies)

'शैक्षणिक उद्‌दिष्टपूर्तीसाठी अभ्यासक्रमातील विविध विषय, त्यातील पाठयांश आणि विद्यार्थ्यांना दयावयाचे अध्ययन अनुभव याबाबतचे सखोल ज्ञान असणे म्हणजे आशयज्ञान क्षमता होय.'

विद्यार्थ्यांना योग्य अध्ययन अनुभव देऊन दैनंदिन अध्ययन—अध्यापन प्रक्रिया प्रभावी परिणामकारक परिपूर्ण व अर्थपूर्ण होण्यासाठी अभ्यासक्रम, पाठयपुस्तकांतील घटक, उपघटक यांच्या आणि आवश्यकतेनुसार संदर्भ साहित्याच्या अभ्यासातून परिपूर्ण आणि संखोल ज्ञान प्राप्त करणे म्हणजे आशयज्ञान क्षमता होय.

विद्यार्थ्यांमध्ये घडवून आणावयाचे बदल विविध विषयांच्या माध्यमातून साध्य करायचे असतात. या विषयांचे आशय विश्लेषण महत्वाचे असते.

४) **शैक्षणिक व्यवहारक्षमता / अध्यापन क्षमता**(Transactional Competencies)

'शैक्षणिक उद्‌दिष्टे सहजतेने साध्य होण्यासाठी दैनंदिन अध्ययन—अध्यापन प्रक्रियेतील शिक्षक—विद्यार्थी, विद्यार्थी—विद्यार्थी, विद्यार्थी—साहित्य आणि विद्यार्थी—परिसर यांमधील परस्पर आंतरक्रिया अर्थपूर्ण करण्यासाठी विविध पध्दती उपक्रम आणि तंत्रे यांचा एकात्म स्वरुपात प्रभावी वापर करण्याचे शिक्षकांमधील कौशल्य म्हणजे शैक्षणिक व्यवहार क्षमता होय.'

शैक्षणिक व्यवहार क्षमतेतील 'व्यवहार' या शब्दाचा दैनंदिन व्यवहारातील रुढ अर्थ येथे अभिप्रेत नाही. शाळेत आणि परिसरात ज्या विविध घटकांशी विद्यार्थ्यांची आंतरक्रिया घडून त्यांचे शिक्षण होते ते सर्व संबंधीत घटक आणि त्या सर्व आंतरक्रियांचा 'शैक्षणिक व्यवहार' या संज्ञेत समावेश होतो.

व्यवहारामध्ये देवाणघेवाण असते शैक्षणिक व्यवहारामधील देवाण घेवाण म्हणजे शिक्षकांनी उद्‌दिष्टे, क्षमता आणि विषयाला पूरक अशा कृती आणि उपक्रम यांच्या स्वरुपातील प्रसंगानुभव विद्यार्थ्यांना दयावयाचे आणि विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद घ्यावयाचा असा व्यवहार असतो.

५) **शैक्षणिक उपक्रम क्षमता**(Competencies Related to other Education Activities)—

'शैक्षणिक उद्‌दिष्टपुर्तीसाठी पोषक असे अभ्यासविषयक आणि सहशालेय उपक्रम कल्पकतेने योजून त्यांची सुत्रबध्द व प्रभावी कार्यवाही करण्याचे कौशल्य म्हणजे शैक्षणिक उपक्रमक्षमता होय.'

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या उपक्रमाचे अनन्य महत्व आहे. हया कार्यक्रमांचे आयोजन का व कसे करायचे? या संबंधीचे निर्णय महत्वाचे ठरतात. या उपक्रमांद्‌वारे मानवी मुल्ये मुले नैसर्गिकरित्या आणि चटकन आत्मसात करतात.

शैक्षणिक उद्‌दिष्टांना आणि क्षमतांना अनुसरुन योग्य उपक्रमांची निवड करणे हे सुध्दा एक कौशल्य आहे.

६) **शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर क्षमता**(Competencies Related to Teaching and Learning Material)—

'शैक्षणिक उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी अध्ययन अध्यापन प्रक्रियेत उपलब्ध परिसर व साहित्य यांचा आणि कल्पकतेने शैक्षणिक साहित्य तयार करुन त्यांचा अर्थपूर्ण उपयोग करण्याची क्षमता म्हणजे शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर क्षमता होय.'

अध्ययन—अध्यापन अर्थपूर्ण होण्यासाठी शैक्षणिक साहित्य योग्य वेळी व योग्य पध्दतीने वापरावे लागते.

७) **मूल्यमापन क्षमता**(Evaluation Competencies)—

'अभ्यासक्रमाची सर्वसाधारण उद्‌दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली आहेत आणि विहित केलेल्या क्षमता विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात विकसीत झाल्या आहेत. हे सातत्याने आणि पुर्णतः पडताळून पाहण्याची शिक्षकांमधील क्षमता म्हणजे मुल्यमापन क्षमता होय.'

मूल्यमापन ही विविध क्षमतांचे विकसन सर्व विद्यार्थ्यांमध्ये झाले की नाही हे विविध प्रकारे वेळोवेळी व पुर्णतः पडताळून पाहण्याची एक प्रक्रिया आहे.

अध्ययनातील अडचणी अथवा अध्यापनातील त्रुटींचा शोध घेणे हे मूल्यमापन प्रक्रियेचे मुख्य कार्य आहे.

विद्यार्थ्यांच्या बौध्दिक, भावनिक आणि क्रियात्मक अशा तिन्ही अंगांचे मूल्यमापन व्हायला हवे.

मूल्यमापन हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीची सातत्याने आणि पूर्णत: पडताळणी करणारे आणि अध्ययनासाठी कार्यप्रेरणा देणारे साधन आहे. परंतु मूल्यमापन प्रक्रियेतून विद्यार्थ्यांवर दडपण निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे जरुरीचे आहे. मूल्यमापनातुन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण प्रगतीचे चित्र अपेक्षित असते. मात्र केवळ लेखी स्वरुपाच्या परीक्षेतील प्रतिसादातून असे चित्र उभे करणे शक्य नसते.

नकारात्मक दृष्टीकोणापेक्षा आता मूल्यमापना बाबत सकारात्मक व विधायक दृष्टिकोन अवलंबणे आवश्यक आहे. नकारात्मक दृष्टिकोनामध्ये भिती, तिरस्कार, बालविकासावर विकृत परिणाम इत्यादी बाबींचा अंतर्भाव असतो. साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, त्रैमासिक अशाप्रकारच्या काल्पिक मूल्यमापनाचाही आढावा शिक्षकांनी घ्यावा.

**८)व्यवस्थापन क्षमता**(Management Competencies)–

'उपलब्ध मनुष्यबळाचा सहज व उत्स्फुर्त सहभाग मिळवून त्याद्वारे उपलब्ध साधनांचा सुयोग्य वापर करुन कमीत कमी वेळ, श्रम आणि खर्चात शैक्षणिक उद्दिष्टे दर्जेदार पातळी पर्यंत प्राप्त करण्याचे कौशल्य म्हणजे व्यवस्थापन क्षमता होय.'

कोणतेही कार्य करण्यापूर्वी ते कसे करावयाचे हा विचार जेथे सुरु होतो तेथेच व्यवस्थापनाला सुरुवात होते.व्यवस्थापनशास्त्र ही एक महत्वाची ज्ञानशाखा आहे. आणि त्यात दर्जेदार अध्ययन आणि अध्यापनाचे नियोजन करणे ही काळाची गरज आहे हे लक्षात घेतल्यास व्यवस्थापन क्षमतेचा विचार अग्रस्थानी येतो.

'एखादया संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्याच्या हेतूने आणि संस्थेतील साधनांचा कुशल आणि परिणामकारक उपयोग करण्याच्या दृष्टीने आखलेल्या विविध उपक्रमांच्या संच म्हणजे व्यवस्थापन होय.'

**९) पालक सहकार्य विषयक क्षमता**(Competencies Related to Parental Co - operation)–

'अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व विद्यार्थ्यांमधील क्षमता पुर्ण विकसीत करण्यासाठी आवश्यक असलेले पालकांचे सहकार्य व सहभाग वैयक्तिक आणि एकत्रित स्वरुपात प्राप्त करुन घेण्याची क्षमता म्हणजे पालक सहकार्य विषयक क्षमता होय.'

या क्षमतेस पालकसंपर्क क्षमता असे ही म्हणतात.

मुलांचे शिक्षण हा एक सहकाराचा प्रयोग आहे. पालक–शिक्षक यांच्यात जेवढे चांगले सामंजस्य तेवढा हा सहकार यशस्वी ठरतो. यासाठी परस्परांच्या भूमिका जबाबदाऱ्या समजणे व त्यानुसार वागणे महत्वाचे ठरते.

**१०) समाज सहकार्य विषयक क्षमता**(Competencies Related to Co - operation with Community)–

'शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी समाजामध्ये जाणीव, जागृती, आपूलकी आणि जबाबदारीची भावना निर्माण करुन समाजाचे सहकार्य आणि सहभाग मिळविण्याची क्षमता म्हणजेच समाजसहकार्य विषयक क्षमता होय.'

या क्षमतेस समाजसंपर्क क्षमता असे ही म्हणतात.

शाळेच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करणे हे आपले कर्तव्य आहे अशी भावना समाजामध्ये रुजल्याशिवाय शासनाच्या प्रयत्नांना समाजाची जोड मिळू शकणार नाही.

❖ **शिक्षकांच्या व्यावसायिक तयारीची गरज –**

- एका सर्वसामान्य व्यक्तीचे सक्षम आणि व्यवसायनिष्ठ व्यक्तीत रुपांतर होणे ही सेवापूर्व शिक्षणाची प्रक्रिया असते.

- सेवापूर्व प्रशिक्षणात प्रारंभिक स्वरुपातील व्यावसायिक परिवर्तन अपेक्षित असते.
- ज्ञान व माहिती यासंबंधी आपला अधिकार याबाबतची योग्य जाणीव शिक्षकांमध्ये निर्माण करणे हे महत्वपुर्ण कार्य या काळात अपेक्षित आहे.
- शिक्षक शिक्षणाने केवळ व्यवसायनिष्ठ कुशल शिक्षकांची निर्मिती एवढेच उद्दिष्ट मानु नये. शिक्षणाची अनेकविध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षण संस्थामधून अनुकूल वातावरण निर्मितीसाठी झटावे.
- शिक्षकांसाठी अत्यावश्यक कौशल्य, कल आणि मुल्ये यांचा विचार शिक्षक शिक्षणात महत्वाचा गणला जातो.
- शिक्षण प्रक्रियेतील अध्ययन अनुभव हे व्यवहार्यता स्वीकार्यता आणि समर्पकता या दृष्टीनी युक्त असले पाहिजे.
- प्राथमिक आणि माध्यमिक शालेय स्तरांवर जेंव्हा शिक्षक तयार केले जातात तेंव्हा प्रशिक्षणार्थींना एका विशिष्ट काम दिले जाते हे काम या स्तराशी निगडीत असते. सेवापूर्व प्रशिक्षण कालखंडात शिक्षकाची तयारी कोणत्या प्रकारे करुन घ्यावी या मुद्याचा प्रामुख्याने विचार केलेला असतो.
- सेवापुर्व शिक्षक शिक्षण ही सामान्य व्यक्तीचे कार्यक्षम शिक्षकामध्ये परिवर्तन करण्याची प्रक्रिया आहे.
- प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षाणार्थ्यांची आवश्यक सर्वसामान्य शैक्षणिक पात्रता आरंभ बिंदू मानून त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यात परिवर्तन करावयाचे असते तरच ते तज्ज्ञ व्यावसायिक म्हणून घडतील.
- २१ व्या शतकातील शिक्षकांपुढील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी परिपुर्ण तयारीची गरज आहे. ती गरज पुर्ण करण्याची जबाबदारी सेवापूर्व व सेवांतर्गत शिक्षक शिक्षणाची आहे.ही जबाबदारी सध्या बी.एड् महाविद्यालय करत आहे.शिक्षकांच्या आवश्यक क्षमता व सध्याचा अभ्यासक्रम पूर्ण करत आहे.
- **बी.एड् २०१४—१५ च्या नविन अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये विकसीत होणाऱ्या क्षमता पुढीलप्रमाणे.**

**B. Ed. SYLLABUS FRAMEWORK 2015**
**(Based on NCTE Regulations 2014)**
**B.Ed. FIRST YEAR**

| Course Code | Title of the Course | Competencies |
|---|---|---|
| | **PERSPECTIVES OF EDUCATION – CORE COURSES** | |
| BED101 | Childhood and Growing up | Contexual ,Conceptual |
| BED102 | Contemporary IndianEducation, Gender and Society | Contexual ,Conceptual |
| BED103 | Learning and Teaching | Contexual,Conceptual |
| BED104 | Assessment and Evaluation for Learning | Contexual ,Conceptual |
| BED105 | Advanced Pedagogy and Application of ICT | Contexual,Conceptual |
| | **SPECIALIZED COURSES- OPTIONAL COURSES** | |
| BED106 01 to 11 | Understanding disciplines and school subjects (any two from the list No. 1) | Content Knowledge |
| BED107 01 to 11 | Pedagogy of school subjects(any two from the list No. 2) | Transactional |
| | **PRACTICING FOR CONSTRUCTIVIST TEACHING LEARNING** | |

| | | |
|---|---|---|
| BED108 | **Teaching Competency I**(a)Micro Teaching(b)Integration Lessons and Simulation Lessons | Transactional, Teaching and Learning Material |
| BED109 | **Teaching Competency II**(a) Technology based teaching(b) Team teaching(c)Lessons using Models of teaching | Management,Transactional,Teaching and Learning Material |
| BED110 | **Teaching Competency III**(a)Practice Lessons(b) Introduction to Internship | Management,Transactional other Education Activities, Teaching and Learning Material |
| | **ENHANCING PROFESSIONAL CAPACITIES** | |
| BED111 | A) Critical understanding of ICT – Practical<br>B) Co curricular Activities and social service | Management ,Co - operation with Community other Education Activities, Teaching and Learning Material |
| BED112 | Health and Yoga | Management |

**B.Ed. SECOND YEAR**

| Course Code | Title of the Course | Competencies |
|---|---|---|
| | **PERSPECTIVES OF EDUCATION – CORE COURSES** | |
| BED201 | Quality and Management of School Education | Contexual ,Conceptual, Management |
| BED202 | Knowledge and curriculum, Language across curriculum | Contexual ,Conceptual |
| BED203 | School and Inclusive School | Contexual ,Conceptual |
| | **SPECIALIZED COURSES- OPTIONAL COURSES** | |
| BED204 01 to 11 | Elective(any one from the list No. 3) | Content Knowledge |
| BED205 01 to 28 | AdditionalPedagogyCourse Understanding disciplines andPedagogy of schoolsubject | Transactional |
| | **PRACTICING FOR CONSTRUCTIVIST TEACHING LEARNING** | |
| BED206 | **Teaching Competency IV:** Practice Lessons | Transactional ,Teaching and Learning Material |
| BED207 | **Teaching Competency V:** Internship | Transactional ,Teaching and Learning Material |
| | **ENHANCING PROFESSIONAL CAPACITIES** | |
| BED208 | Reading and Reflecting on Texts | Contexual ,Conceptual |
| BED209 | Understanding of Self | Contexual, Conceptual |
| BED 210 | Basics of Research | Contexual, Conceptual |
| BED 211 | Drama and Art in Education | Conceptual, other Education Activities |
| BED 212 | Open Course or Entrepreneurship Development | Conceptual |

अशा रितीने बी.एड् २०१४–१५ च्या नविन अभ्यासक्रमातूनवरील सर्व क्षमतांचा विचार केला गेलेला आहे. त्यामुळे हा अभ्यासक्रमपूर्ण करुन बाहेर पडणारे शिक्षक हे सर्व क्षमता विकसीत झालेले असतील त्यामुळे शिक्षकांची फक्त संख्यात्मक वाढ न होता गुणात्मक वाढ होण्यास मदत होईल.

**संदर्भ—**

*शेवतेकर, शारदा, निकमे, मदन (जूलै २०११) भारतीय शिक्षक – शिक्षण प्रणाली प्रथमआवृत्ती, विद्या प्रकाशन, नागपुर.*

*जगताप, ह.ना. (सप्टेंबर २००८)शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने (तृतीय आवृत्ती)नित्य नूतन प्रकाशन, पुणे.*

*भाळवणकर वा.गो., प्राथमिक शिक्षण सद्यस्थिती, समस्या व उपाय (नोव्हेंबर २००६) सुविचार प्रकाशन, पुणे.*